RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक १०] गुरुवार, फेब्रुवारी २३, २०२३/फाल्गुन ४, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

### असाधारण क्रमांक १४

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०२३.

### अधिसूचना

क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.१२/का-८, दिनांक २० फेब्रुवारी, २०२३.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० पोट-कलम (१) खंड (ब) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे- प्रत्येक गाव (राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी विहित रितीने) ठरवील अशा प्रभागात विभागण्यात येईल आणि प्रत्येक प्रभागातून निवडावयाची पंचायतीच्या सदस्यांची संख्या (राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी विहित रितीने) ठरवील इतकी असेल ;

आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११ मार्च, २०२२ च्या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मधील "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल." अशी दुरुस्ती करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक १७ जानेवारी, २०२३ च्या आदेशान्वये राज्यातील माहे जानेवारी, २०२३ ते डिसेंबर, २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम दिलेला आहे. या

आदेशातील मुद्दा क्र. ५.५ नुसार "राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याने मान्यता दिल्यानंतर जिल्हाधिकारी प्रारुप अधिसूचनेस व्यापक प्रसिद्धी देतील," असे नमूद केले आहे. तसेच मुद्दा क्र. ८.३ नुसार "अंतिम प्रभाग रचना, आदेशातील कार्यपद्धतीनुसार झाली आहे याबाबत समाधान झाल्यावर जिल्हाधिकारी अंतिम प्रभागरचना व नकाशे राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसाठी सादर करतील," असे नमूद केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० (१) (ब) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीची प्रभाग रचना व सदस्य संख्या निश्चित करणे तसेच कलम १० (२) नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी जागा आरक्षित करण्याचे अधिकार आयोगाने दिनांक २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, "सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११ मार्च, २०२२" च्या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मधील (प्रभाग रचना व सदस्य संख्या निश्चित करणे)" राज्य शासनास प्राप्त झालेले अधिकार, शासनाने दिनांक १७ जानेवारी, २०२३ च्या आदेशान्वये" संबधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग दिनांक २७ जानेवारी, १९९५ च्या आदेशात खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्याचे आदेशित करण्यात येत आहे :—

**परिशिष्ट**

**भाग १**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८**

| अ. क्र. (१) | अधिनियमातील कलम, उप कलम आणि खंड (२) | शासनाचा अधिकारी (३) |
|---|---|---|
| १ | कलम १०, उप कलम (१) खंड (ब) ग्रामपंचायतीचे प्रभागामध्ये विभाजन | विभागीय आयुक्त |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

के. सुर्यकृष्णमूर्ती,
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Hutatma Rajguru Chowk, Madame Cama Road,
Mumbai 400 032, dated 23rd February 2023.

*NOTIFICATION*

No. SEC/VPE-2022/ C.R. No 12/ D-8, Dated 20th February, 2023.—In exercise of the powers conferred by Article 243 K and 243 ZA of the Constitution of India, the State Election Commission has been entrusted with the responsibility of conducting elections to local bodies in the State in a fearless, free and transparent environment ;

AND WHEREAS, section 10 sub-section (*1*) (*b*) of the Maharashtra Village Panchayat Act, 1958 reads as follows- Every village shall be divided into such wards as (the State Election Commission or its authorized officer may prescribe) and the number of members of the Panchayat to be elected from each ward shall be such (the State Election Commission or its authorized officer may prescribe) as prescribed ;

AND WHEREAS, the said provision has been replaced *vide* the amendment in Maharashtra Act No. 22, dated 11th March, 2022 which states that "In section 10 sub-section (*1*) clause (*b*) of the Maharashtra Village Panchayat Act, the term "State Election Commission" is mentioned twice, which shall be substituted with the term "State Government with the approval of the State Election Commission" ;

AND WHEREAS, the State Government by its order dated 17th January, 2023 has issued the programme of Ward Formation for newly formed Village Panchayat and for the Village Panchayat whose term expires during the period from January, 2023 to December, 2023. In the said order, as per clause 5.5, it is stated that "after approval by the State Election Commission or any officer authorized by it, the Collector shall give wide publicity to the draft notification." Also as per clause 8.3 of the said order, it is stated that the Collector after being satisfied that the final ward formation has been done in accordance with the provisions laid down, shall submit the final ward formation and maps to the State Election Commission or any officer authorized by it, for approval ;

AND WHEREAS, as per section 10 (*1*) (*b*) of the Maharashtra Village Panchayat Act, the power for the ward formation and to provide number of members of the Village Panchayat and to reserve seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, Backward Classes of Citizens and Women as per Section 10 (*2*) has been delegated by the State Election Commission *vide* its order dated 27th January, 1995 to the concerned District Collector ;

AND WHEREAS, the State Government has delegated its powers under section 10 of the Maharashtra Village Panchayat Act, sub-section (*1*), clause (*b*) (ward formation and number of members) to the concerned District Collector *vide* its Order dated 17th January, 2023.

NOW, THEREFORE, the State Election Commission, in the exercise of its powers under Section 10A (*4*) of the Maharashtra Village Panchayat Act, 1958 along with other powers vested in the State Election Commission in this regard, hereby partially amends the Schedule Part 1 of the order dated 27th January, 1995 as follows.

*Schedule*

PART-1

Maharashtra Village Panchayat Act, 1958.

| Serial No. (1) | Sections, Sub-sections and Clauses of the Act. (2) | Officer of the State Government (3) |
|---|---|---|
| 1 | Section 10, Sub-section (*1*), clause (*b*) for division of a village into wards | Divisional Commissioner |

By order of State Election Commissioner,

K. SURYAKRISHNAMURTY,
Deputy Secretary,
State Election Commission, Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.